आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
सोमवार दिनांक ०४ नोव्हेंबर २०२४

ठळक बातम्या

1. महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस / उमेदवारांच्या माघारीनंतर लढतींचं चित्र होणार स्पष्ट.

2. महाराष्ट्राच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली/ कार्यभार मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसळकर यांच्याकडे.

3. विधानसभा निवडणुकीसाठी प्रचार सभांना सुरवात, परवा राहुल गांधींची नागपुरात सभा, तर पंतप्रधान नरेंद्र मोदी ८ नोव्हेंबरपासून राज्याच्या दौऱ्यावर.

4. परिवर्तन महाशक्ती आघाडीच्या वतीने 121 उमेदवारांची यादी नागपुरात आयोजित पत्रपरिषदेत जाहीर.

अर्ज मागे

आज उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी महायुतीतील शिंदे गटाचे उमेदवार राजू पारवे यांना उमरेडमधून माघार घेण्यास राजी करण्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना यश आले असल्याचे वृत्त आहे.याठिकाणी भाजपचे उमेदवार सुधीर पारवे यांची उमेदवारी कायम राहणार आहे.

*श्री राजू पारवेजी यांनी माझ्या विनंतीला मान देऊन उमरेड मतदार संघातनं आपला अर्ज मागं घेण्याचा निर्णय घेतला, त्याबद्दल मी त्यांचे मनापासनं आभार मानतो. जमिनीवरचे कार्यकर्ते म्हणून, एक आमदार म्हणून, एक समाजसेवक म्हणून त्यांनी अतिशय उत्तम काम केलं आहे. आणि भविष्यामध्ये त्यांच्या पाठीशी उभं राहून त्यांना महत्वाचं पद मिळावं आणि त्यांची राजकीय कारकीर्द जी या निर्णयामुळे थांबते आहे, ती कारकीर्द न थांबता अधिक उंचीवर जाऊन अधिक वेगाने पुढं जावे याकरता मी स्वतः मदत करीन.*

बोरिवली विधानसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करणारे भाजप नेते आणि माजी खासदार गोपाळ शेट्टी यांनी निवडणुकीतून माघार घेण्याची घोषणा केली आहे. अकोल्यातील अकोला पश्चिम मतदारसंघात महायुती आणि महाविकास आघाडीत सर्वाधिक बंडखोरी पाहायला मिळाली. नामांकन अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी बंडखोर उमेदवारांना अर्ज मागे घेण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करण्यात आले. दरम्यान काँग्रेसचे बंडखोर आणि वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार झिशान हुसेन यांनी अखेर आपला

उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे.शिवसेना ठाकरे गटाचे बंडखोर उमेदवार राजेश मिश्रा यांनीही आपला उमेदवारी अर्ज कायम ठेवला आहे. अकोला पश्चिम मध्ये आता चौरंगी लढत होण्याची शक्यता आहे. वाशिम जिल्ह्यातील रिसोड वाशिम आणि कारंजा तिन्ही विधानसभा मतदारसंघात बंडखोरांनी आपली उमेदवारी कायम ठेवली असल्याने वरवर महायुतीविरुद्ध महाविकास आघाडी अशी लढत होईल असे वाटत असतानाच जिल्ह्यात बहुरंगी लढत होण्याचे चिन्ह दिसत आहेत. रिसोड विधानसभा मतदारसंघात ऐकून 19 उमेदवा होते निवडणुकीतून सहा जणांची माघार 13 जण निवडणुक रिंगणात आहेत. आहेत या मतदारसंघात भारतीय जनता पक्षाचे बंडखोर अपक्ष उमेदवार अनंतराव देशमुख यांनी आपला उमेदवारी अर्ज कायम ठेवला आहे. तर वाशिम विधानसभा मतदारसंघांमध्ये एकूण 38 उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता त्यापैकी 16 उमेदवारांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला 22 उमेदवार रिंगणात आहेत त्यामध्ये भारतीय जनता पक्षाचे बंडखोर उमेदवार नागेश घोपें शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे राजा भैया पवार आणि शशिकांत पेंढारकर तर शिवसेनेचे संजू आधार वाडे आणि अपक्ष राजरत्न आंबेडकर या प्रमुख उमेदवारानी आपला अर्ज कायम ठेवला. कारंजा विधानसभा मतदारसंघांमध्ये एकूण 43 उमेदवारानी अर्जं दाखल केले होते त्यापैकी 16 उमेदवारांनी अर्ज मागे घेतले तर 27 उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज कायम ठेवले आहेत. दरम्यान, बुलढाणा मतदारसंघातून भाजपचे विजयराज शिंदे यांनी आपली उमेदवारी मागे घेतली आहे. तत्पुर्वी आज सकाळी मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणुकीतून माघार घेतली आहे. आपल्या सर्व उमेदवारांना त्यांनी अर्ज मागे घेण्याचं आवाहन केलं आहे. मित्रपक्षांनी अर्ज पाठवले नसल्यामुळं माघार घेत असल्याचं, त्यांनी आज सकाळी जालन्यात आंतरवाली सराटी इथं वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. मराठा समाजाच्या न्याय हक्कासाठीचा लढा यापुढेही सुरूच राहणार असल्याचं ते म्हणाले. दरम्यान, लोकशाहीमध्ये निवडणूक लढवणे त्याचप्रमाणे न लढवणे हा अधिकार असतो या अधिकाऱ्याच्या अंतर्गत जरांगेंनी हा निर्णय घेतला असेल तर त्याबद्दल आपल्याला काही हरकत नाही. परंतु जरांगेने कुठली राजकीय भूमिका घेतली तर त्यावर आपण जरूर मत व्यक्त करू असे मुंबईमध्ये उपमुख्यमंत्री आणि भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

## रश्मी शुक्ला बदली

केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्राच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची तात्काळ बदली करण्याचे आदेश दिले आहेत. काँग्रेस आणि इतर पक्षांच्या तक्रारीनंतर ही कारवाई करण्यात आली आहे. रिक्त झालेल्या पोलीस महासंचालक पदाचा कार्यभार मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. नवीन महासंचालकांच्या नियुक्तीसाठी तीन आयपीएस अधिकाऱ्यांची समिती येत्या ५ नोव्हेंबरपर्यंत नेमण्याचे निर्देश राज्याच्या मुख्य सचिवांना देण्यात आले आहेत.निवडणूक आयोगाच्या या आदेशाचं काँग्रेसने स्वागत केलं आहे. महाराष्ट्रातली विधानसभा निवडणूक पारदर्शक पद्धतीने होऊ नये, म्हणून सरकारने त्यांना मुदतवाढ दिली होती, हे आज स्पष्ट झालं, अशी प्रतिक्रिया विधानसभेतले विरोधी पक्षेनेते विजय वडेट्टीवार यांनी समाज माध्यमावर दिली आहे. दरम्यान, रश्मी शुक्ला यांच्या कार्यकाळाला मुदतवाढ देण्यावरून नाना पटोले यांनी देवेंद्र फडणवीसांवर बेछूट आरोप केले. मात्र, त्याचे पुरावे नसतील तर आज नाना पटोले यांच्या विरुद्ध निवडणूक आयोगाकडे तक्रार करू, असं भाजपाचे आमदार आणि मुंबई शहर अध्यक्ष आशिष शेलार यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. या निर्णयाबद्दल गृहमंत्री आणि भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांना मुंबईत प्रसार माध्यमांनी  विचारले असता त्यांनी सांगितल की,  केंद्रीय निवडणूक आयोगाने एखादा निर्णय घेतल्यानंतर त्यावर फार काही प्रतिक्रिया देण्याचे कारण नाही आता विरोधकांना माझे एकच सांगणे आहे की त्यांनी या निर्णयानंतर निवडणूक आयोग किती चांगला असं म्हटलं आहे .परंतु निवडणुकीनंतर जर महायुतीचा सरकार आलं तर त्यांनी याचं खापर निवडणूक आयोगावर फोडू नये.

## पहिली आशियाई बौद्ध शिखर परिषद

केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालय, आंतरराष्ट्रीय बुद्धिस्ट कॉन्फेडरेशनच्या सहकार्याने नवी दिल्ली इथं 5 ते 6 नोव्हेंबर रोजी पहिली आशियाई बौद्ध शिखर परिषद आयोजित करत आहे. 'आशिया खंडाच्या बळकटीकरणात बुद्ध धम्माची भूमिका' ही या शिखर परिषदेची मुख्य संकल्पना आहे. शिखर परिषदेच्या माध्यमातून, संवादाला चालना देण्यासाठी, समजूतदारपणाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि बौद्ध समुदायाला भेडसावणाऱ्या समकालीन आव्हानांना तोंड देण्यासाठी आशिया खंडातील विविध बौद्ध परंपरेतील  नेते, विद्वान, तज्ञ आणि अभ्यासक या परिषदेत  एकत्र येतील.

आशियाई बौद्ध शिखर परिषदेत बौद्ध कला, वास्तुकला आणि वारसा, बौद्ध कारिका आणि बौद्ध धम्माचा प्रसार, पवित्र बौद्ध अवशेषांची भूमिका आणि समाजातील त्याची प्रासंगिकता, वैज्ञानिक संशोधन आणि कल्याणामध्ये बौद्ध धम्माचे महत्त्व, 21 व्या शतकात

बौद्ध साहित्य आणि तत्वज्ञानाची भूमिका या विषयांचा समावेश असेल. तसेच आशियाला जोडणारा 'धम्म सेतू-भारत' या संकल्पनेवर आधारित एक विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आलं आहे.

<u>परिवर्तन महाशक्ती</u>

छत्रपती संभाजीराजे, बच्चू कडू, राजू शेट्टी, वामनराव चटप, धनंजय जाधव यांच्यासह अनेक समविचारी नेत्यांची नागपूर येथे एकत्रित बैठक पार पडली. या बैठकीतच 121 उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली. परिवर्तन महाशक्तीमध्ये चांगल्या पार्श्वभुमीचे नेते एकत्र आले आहेत. विनावाद जागा वाटप पूर्ण झाले असल्याचे छत्रपती संभाजीराजे यांनी सांगितले.राज्यातील तिसरी आघाडी परिवर्तन महाशक्ती आघाडीच्या वतीने विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. परिवर्तन महाशक्तीने राज्यातील सर्व भागातील 121 मतदारसंघांमध्ये उमेदवार दिले आहे. विरोधी पक्ष नेते आणि सरकार या निवडणुकीत पैशाची उधळपट्टी करत आहे. मतदारांनी पैसे वाल्यांकडे जाऊ नका असा टोला बच्चू कडू यांनी लावला वामनराव चटप यांनी महायुती, महविकास आघाडी जनेची आर्थिक लूट करत असल्याची भावना व्यक्त केली. महायुती सरकार वर आरोप परिवर्तन महाशक्ती आघाडीच्या नेत्यांनी केला.

<u>प्रचार सभा</u>

महाराष्ट्रात आगामी विधानसभा निवडणुकीसाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ८ ते १४ नोव्हेंबर दरम्यान ११ सभा घेणार आहेत धुळे, नाशिक, अकोला, नांदेड, चंद्रपूर, चिमूर, सोलापूर, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नवी मुंबई आणि मुंबई इथं या सभा होतील, अशी माहिती प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे. दरम्यान परवा, सहा नोव्हेंबरला नागपूरात संविधान संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनाला कॉंग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी उपस्थित राहणार आहेत. ही सभा रेशीमबाग इथं होणार आहे. तत्पूर्वी, आज, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते आज संध्याकाळी नागपुरात भाजपच्या तीन निवडणूक कार्यालयांचं उद्घाटन होणार आहे. यात दक्षिण नागपूर इथं मोहन मते यांच्या, पूर्व नागपूर इथं कृष्णा खोपडे यांच्या आणि मध्य नागपूर मतदारसंघातील प्रवीण दटके यांच्या कार्यालयांचा समावेश आहे. त्यानंतर उमेदवारांसाठीच्या सभेला गडकरी संबोधित करणार आहेत.